

श्री. हरि सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित यांचा श्रीशिर्डी येथील वाडा.

# श्री सद्गुरुसाईनाथ प्रसन्न.

स्ना. न. वि. वि. अर्थ व टीपांसह २१ संस्कृत पद्यरूपी एक दुर्वांकुरांची जुडी श्री शारदेसह श्रीसाईगणेशसद्गुरूंना अर्पण करीत आहे. तरी वरील ओबडधोबड जुडीस आपल्या श्री साईलीलेंत स्थान मिळेल अशी आशा आहे.

श्लोक. १–८ वंदननमनाष्टकम्.
९ सद्‌गुरुनामत्रयम्.
१०–१२ नामसार्थत्वम्.
१३ नाथनामसार्थत्वम्.
१४ ममसर्वस्वम्.
१५ सद्गुरुनामाब्धिमज्जनफलम्.
१६–१९ आकांक्षा.
२०–२१ प्रार्थना.

## —वंदननमनाष्टकम्—

प्रहर्षिणी.

विघ्नेशं गजवदनं गणेशसाईम् ।
क्रीडन्तं विविधविलासनृत्यगीतैः ।
वाग्देव्याऽमृतमधु विद्यया च सार्धम् ।
वंदे त्वां स्मितमुखशारदासमेतम् ॥ १ ॥

अर्थ—विघ्नांचा नाश करणारे, गजवदन, नानाप्रकारचे विलास नृत्य व गीत यांनी वाचादेवी व अमृतमय अशी जी मधुविद्या म्हणजे ब्रह्मविद्या या दोघींबरोबर क्रीडा करणारे आपण गणराजसाई त्या आपणा गणराजास हास्यवदन शारदेसहवर्तमान वंदन करितो.

उपजाति.

परावरं सद्गुरू दत्तराजम् । ज्ञानेश्वरं सद्गुरुपाधिराजम् ॥
उमावरं सद्गुरुसाइराजम् । कैवल्यदं राजगणं नमामि ॥ २ ॥

अर्थ—आपण परा म्हणजे श्रेष्ठ जी चौथी ज्ञानवाचा तिचे प्रत्यक्ष ईश सद्गुरु दत्तराज आहां. त्याचप्रमाणें आपण प्रत्यक्ष लक्ष्मीरमण विष्णू असे सद्गुरु ज्ञानराज अहां. तसेच आपण प्रत्यक्ष उमावर शंकर असे सद्गुरु साइराज अहां. मुक्तिफल देणारे आपणच राजत्रय, त्या आपणांस मी नमस्कार करतों.

रथोद्धता.

दत्तपादकमलं कमनीयम् । ज्ञानराजसुपदं रमणीयम् ॥
साइनाथचरणं स्मरणीयम् । पूजये त्रिपदमादरणीयम् ॥ ३ ॥

अर्थ—दत्तावतार बाबांचें पदकमलं सुंदर आहे. ज्ञानेश्वरावतार बाबांचे सुंदर पद मनोहर आहे. साइनाथचरण स्मरण करण्यास योग्य आहेत. या प्रमाणें सन्माननीय अशीं जीं तीन्ही आपलींच पदें त्यांचीं मी पूजा करतों.

शार्दूलविक्रीडितम्.

संसारश्रमतप्तशांतितरवे मित्राय तुभ्यं नमः ।
सद्भक्त्या जगदात्मने च रवये नित्यं नमस्ते नमः ।
तेजःपुंजखगोलशीर्षमणये सूर्याय तुभ्यं नमः ।
लावण्योदधिभानवे भगवते नित्यं नमस्ते नमः ॥ ४ ॥

चिद्रत्नाय खगाय संविहरते दिव्याम्बरे ते नमः ।
पूष्णे पुष्टिविवर्धकाय जगतो नित्यं नमस्ते नमः ।
विद्युत्कांतिहिरण्यगर्भविभवे रम्याय तुभ्यं नमः ।
आनंदाय मरीचिने च शिरसा नित्यं नमस्ते नमः ॥ ५ ॥

आदित्याय नमोऽस्तु तेजनिधये श्रीशाय तुभ्यं नमः ।
लीलाबुद्धिविकासकायखलु ते नित्यं सवित्रे नमः ।
अर्कायास्तु नमो नमो द्युतिपते श्रीशाय तुभ्यं नमः ।
चिद्ब्रह्मज्ञानोदयकारकाय च नमः श्री भास्करायास्तु ते ॥६॥

साष्टांगप्रणिपात पुष्पस्रगियं भक्त्यार्पिता ते मया
प्रीत्या स्वीकुरु नाथ तामनुदिनं योगेश्वर त्राहि माम् ।
श्रीसाईशचिदात्मदत्तगुरवे भूयः पुनस्ते नमः ।
भूयश्चापि पुनर्नमोस्तु शतशः भूयो नमस्ते नमः ॥७॥

अर्थ.—संसारश्रमापासून तापलेल्यास शांति (छाया) देणारे वृक्षरूपी **मित्र** त्या आपणांस माझा नमस्कार. सर्व जगाचा आत्मा असे जे **रवि** त्या आपणांस उत्तम भक्तीनें माझा निरंतर नमस्कार. आकाशांतील तेजःपुंज गोलकांतील शिरोमणि जे **सूर्य** त्या आपणांस माझा नमस्कार. भगवान् सौंदर्यसागर जे **भानू** त्या आपणांस माझा नित्य नमस्कार. दिव्य आकाशांत स्वच्छंद विहार करणारे चैतन्यरत्न जे **खग** त्या आपणांस माझा नमस्कार. विश्वाची पुष्टि वर्धन करणारे जे **पूषन्** त्या आपणांस माझा नमस्कार. विजेप्रमाणें प्रकाशमान मनोहर जे **हिरण्यगर्भ** विभु त्या आपणांस माझा नमस्कार. आनंदरूप जे **मरीची** त्या आपणांस माझा सदासर्वदा साष्टांग नमस्कार. तेजसमुद्र व बुद्धिचे मालक जे **आदित्य** त्या आपणांस माझा नमस्कार. खरोखरच लीलेनें बुद्धीचा विकास करणारे जे **सविता** त्या आपणांस माझा अखंड नमस्कार. लक्ष्मीरमण-सौंदर्यवान् जे **अर्क** त्या आपणांस माझा नमस्कार. ब्रह्मज्ञानाचा अंतःकरणांत उदय करणारे जे **भास्कर** त्या आपणांला माझा नमस्कार. ही बारा साष्टांग नमस्काररूपी कुसुममाला भक्तीनें आपणाला अर्पण केली आहे. तरी हे योगेश्वर, तिचा प्रेमानें स्वीकार करून माझें निरंतर आपण संरक्षण करा. दत्तगुरु श्रीसाईराज चैत-

व्यापन परमात्मा यांस मी पुन्हः पुन्हः नमस्कार करतों. आणखी पुन्हः पुन्हः हजार वेळां पुनः नमस्कार करतों.

मंदाक्रान्ता.

मंदाकिन्याः कमिव विशदं यस्य पादारविंदात्।
मंदं मंदं मधुर मकरंदं स्रुतं स्वादुगन्धम्।
भक्त्या चास्वादितमतिमुदा साधुवृंदैर्मिलिन्दैः।
वंदे साइं तमचलपदं सच्चिदानंदकंदम् ॥ ८ ॥

अर्थ—ज्यांच्या पदकमलापासून भागिरथीच्या पाण्याप्रमाणें स्वच्छ व ज्यास गोड सुवास येत आहे असा, हळुहळु मधुर मद गळतो आहे व ज्याचा स्वाद भक्तीनें व परम आनंदानें संतरूपी भ्रमर घेत आहेत, त्या अढळपद व सत्ताचैतन्य व आनंद यांचा गड्डा असें जे साइ त्यांस मी वंदन करतों.

## सद्गुरुनामत्रयम्.

अनुष्टुप्.

साइनाथ इति ख्यातः। साइराज स्तथैव च।
साइ बाबेति विज्ञातः। सार्थनामत्रयं गुरोः ॥ ९ ॥

अर्थ–महाराजांना कोणी साइनाथ म्हणतात. कोणी त्यांस साइराज असें म्हणतात. कोणी त्यांस साइबाबा असें म्हणतात. सद्गुरूंचीं ( महाराजांचीं ) तिन्ही नांवें अर्थपूर्ण आहेत म्ह. अन्वर्थक आहेत.

---

टीपः–१. "साइ" हा शब्द छंद जुळविण्याकरितां कित्येक ठिकाणीं इकारान्त ऱ्हस्व "हरिः" शब्दाप्रमाणें घेतला आहे; व कित्येक ठिकाणीं इन्नंत "करिन्" शब्दाप्रमाणें घेतला आहे.

२. "बाबा" हा शब्द, त्यांत कांहीं बदल न करितां तसाचा तसाच ठेविला आहे; व संधीमध्येंही त्याचा तसाच उपयोग केला आहे.

# नामसार्थत्वम्

इंद्रवज्रा.

१०. सार्वज्ञ इष्टदः साइ । नाभिजन्मा थनाशकः ।
साइनाथ इतिख्यातः । अत एव महीतले ॥ १० ॥

अर्थ—बाबा सर्व जाणणारे, इष्ट देणारे प्रत्यक्ष ब्रह्मदेव व ( भव ) भयाचे नाश करणारे म्हणून त्यांस या धरिणीतलावर साइनाथ असें म्हणतात.*

इंद्रवज्रा.

११. साक्षात्स इन्दिरा कान्तः । रामोऽयं जानकीधवः ।
अतः स साइराजेति । विज्ञातो मेदिनीतले ॥ ११ ॥

अर्थः—बाबा प्रत्यक्ष इंदिराकांत विष्णू व जानकीरमण प्रभु राम आहेत. म्हणून त्यांस या जगतितलावर **साईराजा** असें म्हणतात.

---

* मागील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें सद्गुरूंचीं दोन्हीं नांवें कशी सार्थ आहेत हें १०, ११, व १२ या श्लोकांत दाखविलें आहे. साइनाथ या शब्दांतील पहिल्या " सा " या अक्षराचा अर्थ " सार्वज्ञ " " इ " या अक्षराचा अर्थ "इष्टद " म्ह० इच्छित फल देणारा " ना " या अक्षराचा अर्थ " नाभिजन्मा " म्ह. ब्रह्मदेव व " थ " या अक्षराचा अर्थ भय ( भवभय ) नाश न करणारा, म्हणून सर्व जाणणारे इप्सित देणारे व संसार भय नाश करणारे ते ब्रह्मदेवस्वरूप साइनाथ आहेत.

टीप—साइराजा या शब्दांतील " राजा " हा शब्द मराठीप्रमाणेंच वापरला आहे. साइराजा या शब्दांतील पहिल्या " सा " या अक्षराचा अर्थ " साक्षात् " "इ "चा अर्थ " इन्दिराकांत " " रा "चा अर्थ " राम " व " जा "चा अर्थ " जानकीपति " म्हणून साक्षात् राम व विष्णूस्वरूप ते " साइराजा " आहेत.

इंद्रवज्रा.

साम्बः स ईश्वरः साई । बाबा वै बालबान्धवः ।
अतः स साइबाबेति । विश्रुतो भूमिमण्डले ॥ १२ ॥

अर्थः—बाबा हे प्रत्यक्ष शंकर परमात्मा व अज्ञान दीनबन्धू आहेत म्हणून त्यांस या भूमंडळावर साइबाबा असे म्हणतात.

## नाथनामसार्थत्वम् (वसंततिलका)

नाथा भवन्ति बहवो भुवि मानवेषु ।
मुञ्चन्ति ते भवभयान्न कदापि दीनान् ।
श्रीसाइनाथ सदृशो विरलोऽपि नाथः ।
कुर्वन्ननाथनिजभक्तवरान् सनाथान् ॥ १३ ॥

अर्थः—ह्या भूतलावर मनुष्यामध्यें नाथ ( नांवाचे ) पुष्कळ आहेत परंतु ते दीन जनांना केव्हांही संसारभयापासून मुक्त करीत नाहींत. आपल्या अनाथ व श्रेष्ठ भक्तांना सनाथ करणारा श्रीसाइनाथासारखा दुसरा खरोखर क्वचितच नाथ असेल.

## ममसर्वस्वम् ( पृथ्वी. )

मदीय जननी भवान् जनकबंधुवर्गो भवान् ।
मदीय सुहृदो भवान् सभगशांतकांतो भवान् ।
मदीयमखिलं भवान् सदय साइनाथ प्रभो ।
भवत्पदरजो विना नहि परं न जाने नहि ॥ १४ ॥

---

टीपः—"साईबाबा" यांतील "सा" चा अर्थ "सांबशंकर" "ई" चा अर्थ "ईश्वर" पहिल्या "बा" चा अर्थ "बाल-अज्ञान, दीन, व दुसऱ्या "बा" चा अर्थ "बान्धव" म्हणून ते साक्षात् दीनबंधु-शंकरस्वरूप आहेत.

अर्थः—हे दयाळु प्रभो साईनाथ, आपणच माझी आई, आपणच माझे जनक, व आप्तसंबंधी आहां. आपणच माझें कल्याण करणारे मि(त्र) त्याचप्रमाणें भाग्यशाली शांत व सुंदर असे ईश आहां. माझें जें कांहीं वस्तु आहे तें सर्व आपणच आहां. आपल्या पायाच्या रजःकणांवांचून खात्रीनें खरोखरच मी दुसरें कांहींच जाणत नाहीं.

## सद्गुरुनामाब्धिमज्जनफलम्.

पृथ्वी.

त्वदीय किल सद्गुरो सुरसनिम्ननामार्णवः
नभीः सलिल सेवने नहि निमज्जनं नाशकृत् ।
त्वदङ्घ्रिसुनिमग्नधीः भवति धाविताहंकृतिः ।
पुनश्च ननु विंदते मधुरमुक्तिमुक्ताफलम् ॥ १५ ॥

अर्थः—हे सद्गुरो, खरोखरच आपला नामसमुद्र पिण्यास गोड व पोहण्याला खोल आहे. त्याचें पाणी प्यायल्यापासून (कारण तें खारट नाहीं) बिलकुल भय नाहीं. तसेंच त्यांत बुडण्यापासून खात्रीनें नाश होत नाहीं. (इतकेंच नव्हे तर) आपल्या सागरांत जो खूप बुडून राहील त्याच्या (देह) अहंकाराचें (मळ) क्षालन होतें, व त्याशिवाय त्याला खात्रीनें मधुर मुक्तिरूपी मौक्तिक फळ उपभोगास मिळतें.

## आकांक्षा.

आर्या.

मनुजाकारांमूर्तिम् मुनिमुकुटमणिं मुकुंदमीशानम् ।
कल्पांगकुसुमकीर्तिं कांक्षे साईं कठोरकालहरम् ॥ १६ ॥

---

१ टीपः—या कवितेंत क्षार समुद्र व नामसमुद्र यांची तुलना केली आहे.

१ कल्पांग—कल्प + अग. कल्प म्ह. कल्पित किंवा इच्छित देणारा. अग म्ह. वृक्ष. अ म्हणजे नाहीं, ग म्हणजे गमन किंवा गति ज्याला तो—अग. सर्वांचा मिळून अर्थ इच्छित फळ देणारा किंवा मनोरथ पुरविणारा कल्पवृक्ष.

अर्थ—मनुष्यरूप धारण केलेली मूर्ती, मुनिशिरोरत्न, प्रत्यक्ष विष्णु व शंकर, कल्पवृक्षाच्या फुलाप्रमाणें ज्यांची कीर्ती व जे निर्गुणकाळाचा नाश करणारे असे गुरुराज साई त्यांची मी इच्छा करतों.

उपेंद्रवज्रा ( उपजाति )

न रत्नमुक्ताभरणानि कांक्षे ।
कांक्षे विरक्तिं न तथा च मुक्तिम् ।
आभातितत्सर्वमिदं गुरो मे ।
सत्यं च मुक्ताफलशुक्तिरेव ॥ १७ ॥

अर्थ—रत्न मोत्यें वगैरेच्या दागिन्यांची ( संपत्तीची ) इच्छा नाहीं त्याचप्रमाणें वैराग्याची आणि मोक्षाचीही इच्छा नाहीं. हे गुरो, खरोखरच हें सर्व मला मोत्याच्या शिंपल्याच्या भासाप्रमाणें दिसतें. ( म्ह. वरील सर्व गोष्टी आभासिक म्हणून मिथ्या आहेत असें वाटतें. )

उपेंद्रवज्रा.

भोक्तुं न शक्तिं विषगर्भभोगान् ।
उक्तिं न श्रोतुं कविपंडितानाम् ।
कांक्षे सुभक्तिं तव पादकंजे ।
हृद्यां स्थिरामव्यभिचारिणीं च ॥ १८ ॥

अर्थः—विषानें भरलेले विषयभोग भोगण्यास शक्ति मिळविण्याची इच्छा नाहीं. त्याचप्रमाणें कवि व पंडितांचीं वचनें ( व्याख्यानें ) ऐकण्याची इच्छा नाहीं. फक्त आपल्या चरणकमलीं उत्कट आनंद देणारी अचल व एकनिष्ट भक्तीची इच्छा करतों.

शार्दूलविक्रीडितम्.

सावित्रीधर विश्वसृट् च जगतो यः पालकः श्रीधरः ।
यो गंगाधरशंकरश्च वरदो विश्वस्य संहारकः ।
एवं यस्त्रिगुणात्मको ऽपि त्रिगुणो दत्तावतारो गुरुः ।
सः साई भगवांश्चिरं वसतु मे हृन्मंदिरे सुंदरे ॥ १९ ॥

अर्थः—बाबा हे प्रत्यक्ष विश्व उत्पन्न करणारें सावित्रीरमण ब्रह्मदेव, जग पालन करणारे प्रत्यक्ष श्रीश विष्णू व ब्रह्मांड संहार करणारे प्रत्यक्ष गंगाकांत शंकर आहेत. या प्रमाणें हे गुरुराज त्रिगुणात्मक दत्तावतार असूनही निर्गुण आहेत. असे ते साई सद्गुरुराज माझ्या अंतःकरणरूपी सुंदर मंदिरांत निरंतर वस्ती करोत.

## प्रार्थना

प्रहर्षिणी.

हे स्वामिन् त्वरितमपावृणु प्रसीद ।
भांडारं तव करुणायनस्य पुण्यम् ।
संभृत्येश्वर मम धीपुटं धनेन ।
सस्नेहं परिहर धीश बुद्धिदैन्यम् ॥ २० ॥

अर्थः—हे प्रभो, आपल्या करुणारूप द्रव्याचा पुण्यखजिना कृपा करून त्वरकर उघडा. व त्यां कृपाद्रव्यानें माझी बुद्धिरूप पोतडी भरा व ममतेनें, हे बुद्धिनायक, माझें बुद्धिदारिद्र्याचा परिहार ( नाश ) करा.

प्रहर्षिणी.

तन्मूले सततमथोद्यमं करिष्ये ।
तद्बुध्यां सुरस शुभाः कथा स्त्वदीयाः ।
आख्यातुं कुरु सदयं क्षमं प्रभो माम् ।
याचे त्वां सविनतबालमंद बुद्धिः ॥ २१ ॥

---

टीपः— २० व २१ हे दोन श्लोक, श्रीज्ञानेश्वरींतील १४ व्या अध्यायांतील प्रथम नमनाच्या ओव्यांपैकीं १७ व १८ या दोन ओव्यांची कल्पना घेऊन, रचले आहेत.

अर्थः—त्या ( करुणाघनरूपी ) भांडवलावर मी निरंतर व्यापार करीन, व त्यांत जे व्याज मिळेल त्या व्याजांत, हे प्रभो, कल्याणकारक व गोड अशा आपल्या कथा सांगण्यास ( लिहिण्यास ) मला आपण दयेनें समर्थ करा इतकी आपल्याजवळ अतिनम्रपणाची जडबुद्धि अज्ञानाची ( बालकाची ) प्रार्थना आहे.

बाबांचें बाळ

---

पद–चाल–(श्रीगुरुचे चरणकंज)

सद्गुरुतें नित्यकाळ प्रेमें तूंचि ध्याई ।
प्रेमें तूंची ध्याई, प्रेमें तूंची ध्याई ॥ धृ ॥
अंतरि तूं सांई धरिं । नामामृत पान करीं ॥
इतर पंथों दूर सारीं । भावें त्यासीं गांईऽऽ ॥ २ ॥

नेम व्रतां सोडुं नको । इतर साधु निंदुं नको ॥
अहंभाव धरूं नको । हीच भाक घेईऽऽ ॥ ३ ॥

उद्धवेश तुज विनवी । गुरुपदीं भाव ठेवी ॥
सर्वकाळ गाई ओवी । नित्य स्मरत जाई ॥ सद्गुरुतें ॥४॥

---

टीपः— १ नांव घेणें ( नांव हेंच सार अमृत ) २ सांप्रदाय. ३ अहंकार ४ शपथ, ( आण, वचन ) ५ कर्त्याचें नांव.

## श्रीसाईबाबांचे भक्तांस खालीलप्रमाणें नोटीसा अलाहिदा सुटत आहेत.

श्रीसंस्थान कमिटीची नेमणूक अहमदनगर डिस्ट्रिक्ट कोर्टानें इ. स. १९२२ मध्यें केली हें आपल्या स्मरणांत असेलच. कमिटींत असलेल्या १५ असामीपैकीं ५ जण ट्रस्टी आहेत आणि त्यांची नेमणूक कोर्टानें तहाहयात केली आहे. बाकीचे १० जणांची नेमणूक तीन वर्षांकरितां करून त्यानंतर त्यांची निवडणूक दर तीन तीन वर्षांनीं भक्तमंडळाकडून होत जावी असें सदर कोर्टानें संस्थानच्या योजनेमध्यें नमूद केलें आहे.

भक्तमंडळाच्या रचनेसंबंधानें नियम करण्याचा अधिकार संस्थान कमिटीस कोर्टानें दिला आहे. या अधिकाराअन्वयें कोर्टानें केलेल्या नियमांची एक प्रत आपले माहिती करितां यासोबत पाठवीत आहें. नवीन निवडणूक या नियमांअन्वयें होईल.

सोबतचे नियम पहातां आपल्याला असें आढळून येईल कीं भक्तमंडळाचे आश्रयदाते, तहाहयात वर्गणीदार आणि सामान्य वर्गणीदार असे ३ वर्ग केले आहेत. आणि त्या निरनिराळे वर्गांस कमिटीपैकीं अनुक्रमें ४, ३ व ३ असे सभासद निवडण्याचा अधिकार आहे. निवडणुकीची वेळ जवळ आली असल्याकारणानें निरनिराळे वर्गांचे मतदार संघाची यादी लवकर करणें जरूर आहे. म्हणून आपणास हें पत्र लिहून विनंती करीत आहें कीं, आपलें नांव कोणत्या वर्गांत घालावें हें कृपा करून ता. २५ जानेवारीपर्यंत संस्थानचे खजीनदार रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर यांस नं. ५ सेंट मार्टिन्स रोड वांद्रें बी.बी.सी. आय. या पत्त्यावर लेखी कळवावें. आणि त्याच म्हणजे ता. २५ जानेवारीपर्यंत ज्या वर्गांत

आपले नांव घालावयाचें असेल त्या वर्गाची नियमांत ठरविलेली रक्कम संस्थानचे सदर खजिनदाराकडे पावती करावी. आश्रयदात्यांमध्यें नांव घालावयाचे असेल तर कायम फंडांत ५०० रुपये भरले पाहिजेत, नहादयान वर्गणीदारांत नांव घालावयाचें असेल तर कायम फंडांत १०० रुपये भरले पाहिजेत आणि साधारण वर्गणीदारांत नांव घालावयाचें असेल तर शके १८४५ अखेरपर्यंतची सर्व वर्गणी भरली पाहिजे, असें आपल्याला सोबतच्या नियमांवरून स्पष्ट कळून येईल. अर्थात् आपल्याकडून यापूर्वी कायम फंडासाठीं कांहीं वर्गणी आली असेल तर ती वरील रकमेंत आपल्यास मुजरा देण्यांत येईल (म्हणजे अनुक्रमें ५०० किंवा १०० रु. यांत.) नियमाप्रमाणें वर्गणी आली म्हणजेच आपलें नांव घालतां येईल. आपल्याकडून आतांपर्यंत कायमफंडाला रु. आले आहेत आणि कोठीफंडाला म्हणजे संस्थानचे चालू खर्चाला आपलेकडून पावेतो वर्गणी आली आहे. त्यानंतरची वर्गणी येणें आहे.

कळावें बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंती.

आपला.

**हरि सीताराम दीक्षित.**

चिटणीस शिर्डीसंस्थान कमिटी.

## श्री शिर्डीसंस्थानाचें भक्तमंडळासंबंधाचे नियम.

१ सदरील भक्त मंडळाचे सभासदांचे तीन वर्ग केले खालील त येणें प्रमाणें.

( १ ) आश्रयदाते

( २ ) तहाहयात वर्गणीदार

( ३ ) सामान्य वर्गणीदार

२ ज्या भक्तांकडून ( " भक्त " शब्दांत पुरुष भक्त व स्त्री भक्त दोहोंचाही समावेश होतो असें समजावें ) संस्थानाचे कायम फंडांत पांचशें रुपये किंवा त्याहून अधिक रक्कम अथवा त्या किमतीच्या सरकारी नोटा अथवा पोष्टाचीं व्याज सर्टिफीकिटें अथवा म्युनिसिपाल बांड अथवा पोर्ट ट्रस्ट बांड आले असतील त्यांचा समावेश " आश्रयदाते " या वर्गांत होईल.

३ ज्या भक्तांकडून संस्थानाचे कायम फंडांत शंभर रुपये किंवा त्याहून अधिक ( पण पांचशेंहून कमी ) रकम अथवा त्या किंमतीच्या सरकारी नोटा अथवा म्युनिसिपल बॉंड अथवा पोर्ट ट्रस्ट बॉंड आले असतील त्यांचा समावेश " तहाहयात वर्गणीदार " या वर्गांत होईल.

४ ज्या भक्तांकडून संस्थानाचे कोठी फंडांत ( चालू खर्च फंडांत ) सालीना पांच रुपये किंवा अधिक रकम येत असेल त्यांचा समावेश " सामान्य वर्गणीदार " या वर्गांत होईल.

५ ज्या सामान्य वर्गणीदारांकडून चालू साल खेरीज करून मागील सर्व वर्गणी आली असेल त्यानांच सामान्य वर्गणीदाराचे हक्क प्राप्त होतील.

६ श्री शिर्डी संस्थान कमिटीसाठीं तीन तीन वर्षांनीं दहा सभासदांची निवडणूक व्हावयाची ती खालीं लिहिल्याप्रमाणें केली जाईल.

(१) दहापैकी चार सभासद आश्रयदाते यांनी भक्तमंडळाचे कोण-त्याही सभासदातून निवडावे.

(२) दहापैकी तीन सभासद तहहयात वर्गणीदार यांनी भक्तमंडळाच्या कोणत्याही सभासदातून निवडावे.

(३) बाकी राहिलेले तीन सभासद सामान्य वर्गणीदार यांनी वगैरे वरप्रमाणें.

७ आश्रयदाते यांचेकडील निवडणूक झाल्यानंतर पंधरा दिवसांनी तहहयात वर्गणीदार यांजकडील निवडणूक करण्यांत यावी आणि त्यानंतर पंधरा दिवसांनीं सामान्य वर्गणीदार यांजकडील निवडणूक करण्यांत यावी. सर्व निवडणूकी लेखी मतपत्रद्वारा करण्यांत याव्या.

८ वर प्रमाणें दहा सभासदांची निवडणूक झाल्यावर ते व ट्रस्टी मिळून पंधरा जणांची कमिटी होईल त्या कमिटीनें आपल्या पैकीं एकाला अध्यक्ष, एकाला चिटणीस व एकाला खजिनदार असे निवडावें. चिटणीसानें कमिटीच्या सभासदांपैकीं एकाला दुय्यम चिटणीस व खजीनदारानें कमिटीच्या सभासदांपैकीं एकाला दुय्यम खजीनदार नेमावें.

९ कमिटीच्या कोणत्याही सभासदाला एकापेक्षां अधिक हुद्यावर नेमू नये.

श्री. रा. ब. चिंतामणराव विनायक वैद्य एम्. ए., एल्एल्. बी.
कल्याण यांचें पत्र.

रा. वामनराव प्रा. पटेल बी. ए. एल्. एल्. बी.
मुक्काम अमदाबाद यांस,

विनंति विशेष—आपलें पत्र पावलें. मी आरंभीं साईनाथ बावांचे दर्शनास चांदोरकर नानासाहेब यांचे वतीनें एका गृहस्थाबरोबर गेलों होतों. नंतर १९०६ सालीं काँग्रेसहून परत येतांना ( कलकत्त्यास काँग्रेस होती ) शिरडीस जाण्याचा विचार करून मनमाडास उतरलों. मी येणार हें नानासाहेबांस ठाऊक नव्हतें. ते नेहमीं नाताळांत बावांच्या येथें जात त्याप्रमाणे त्यांचा कार्यक्रम आटोपून ते बावांची परवानगी मागण्यास गेले होते, तेव्हां जेवण करून जा, अशी परवानगी मिळाल्यानें जेवण आटोपून बांधाबांध करून गाडया भरून ते बावांस नमस्कार करण्यास गेले. तेथें दरबार भरलाच होता, तास अर्धातास बसून जाण्याची परवानगी मागितली तेव्हां बावा म्हणाले, "अरे जातो कोठें ? तुझा तो स्नेही येतोना ? तुझा बाळपणाचा स्नेही—तो दृष्ट आहे तो ?" यावेळीं सरासरी चार वाजले असावे आणि पंधरा वीस मिनिटांतच माझा टांगा पोंचून मी तांबडतोब दर्शनास गेलों तेव्हां चांदोरकरांस व सर्व मंडळीस आश्चर्य वाटलें. त्यांना व सर्वांना आनंद झाला हें निराळें सांगणें नकोच. गाडया भरलेल्या रिकाम्या केल्या आणि चांदोरकर ते दिवशीं तेथें राहिले व ते आणि मी दुसरे दिवशीं गेलों. ह्या प्रारंभीच्या हकीकतीवरून बावांना बऱ्याच गोष्टी न दिसणाऱ्या दिसत असें मला निश्चित वाटतें.

मी चार पांच वर्षे यानंतर बहुधा नाताळांत जात असें तेव्हां बावा वेदान्तविषयक फार बोलत असत. एक दोन गोष्टी मला आठवतात. ते एक दिवस म्हणाले, अरे नाना, ' येथें केवढा पेरूचा बाग होता ! ( मी कोपर-

गांवाजवळील बागेतून कांही ताजे पेरू नजर म्हणून नेले होते ) हे गोष्ट पेरू! पिवळे रसरसीत ! खूप फळें भरली होतीं, आणि फौज आली. पेरू पाहून वानेवर पडली. एकएकानें पंचवीस पंचवीस तीस तीस खाल्ले. मग दुसरे सकाळी सगळे ढेर झाले. तेव्हां मी सारा सफाई तोडून टाकला." प्रारंभी गोष्ट खरी वाटली पण शेवटच्या परिणामावरून आम्हांस हें रूपक दिसले. संसारांतील सुखांना मोहून मनुष्य त्याजवर बसरतो आणि शेवटीं नाश पावतो. यासाठी संसारवृक्ष तोडून टाकला पाहिजे अशा अर्थाचें हें रूपक होतें. एके वर्षी एक भक्त म्हणाला, " महाराज, आपला मूळ गांव कोणता ? " साईबाबा नेहमी " नौरंगाबादेहून आलों " असें म्हणत असत. " आम्ही नौरंगाबादेहून आलों आणि तो आमचा मामा होता तो आम्हाला घेऊन येथें आला" मग असें झालें तसें झालें, वगैरे सांगू लागले, तें त्यास खरेंच वाटलें. तेव्हां तो विचारूं लागला, 'महाराज त्या मामाचें नांव काय ? त्याचें आतां कोण आहे ?' हा प्रश्न ऐकून महाराज ' हा वेडया त्याचें नांव नसल्या म्हणून हांसले. अविनाशि ब्रह्मरूप आत्म्याचें हें संसरण वर्णन करीत 'असतां' त्यास खरेंच वाटलें. असो. बाबा पुढें फारसें वेदान्तपर बोलले नाहींत. गर्दी फार होऊं लागली. असो. मी पुढें जाणें बंद केलें, कारण पोलिसांनीं नांवें टिपण्याचा प्रघात सुरू केला. मनुस्मृतीच्या श्लोकाप्रमाणें बाबा मुक्त होते असें माझे मत आहे.

कपालं वृक्षमूलंच कुचेलमसहायता ।
सर्वत्र समतादृष्टिरेतन्मुक्तस्य लक्षणम् मनु । —॥ अ. १०

## रा. रा. वासुदेव सीताराम रतांजनकर नाईब अबकारी हदगांव यांचे श्री. हरि सीताराम दीक्षित यांस आलेलें पत्र.

नमस्कार वि. वि. मि. कार्तिक शु० १४ रविवार ता. १०।११।२४.

या संसारांत परमेश्वराच्या लीलेचे नित्यश: अनेक अनुभव येत असले तरी नित्याच्या परिचयामुळें मनुष्य तिकडे डोळेझांक करतो. परंतु एकादा विवक्षित अनुभव आला म्हणजे डोळ्यांची झापड उडून आश्चर्यानें ईश्वरी लीलेचें कौतुकच एकसारखें पहात रहावेंसें वाटतें. काळोखांत आकाशाकडे पाहिलें तरी अगोदर ल्हानसहान तान्यांकडे दृष्टी न वळतां जशी ठळक तान्यांकडे एकदम वेधते, तद्वतच संसारांतील येणाऱ्या ल्हानमोठ्या सुखदु:खाच्या अनुभवाचें असतें. समर्थांचे कृपेनें मी एक अशाच मोठ्या संकटांतून निभावलों, व तो प्रसंग केवळ श्रीसमर्थांचे कृपेनेंच पार पडला याबद्दल मला स्वत:ला मनोमन खात्री आली व त्या माझ्या खात्रीला समर्थांसारख्या एका थोर विभूतीनें स्पष्टीकरण करून अधिक बळकटी दिली याबद्दलची सर्व खुलासेवार हकीकत आपणांसारख्या साईभक्तांना कळविणें इष्ट वाटल्यावरून व बऱ्याच दिवसांपासून घोळत असलेले मनांतले विचार आपणास कळवून मनाचा भार हलका होईल असें वाटून कळवीत आहें:—

मी व माझें कुटुंब ( सौ. सत्यभामा ) उभयतां दोन वर्षांपासून हदगांव ( निजाम–स्टेट ) येथें आहोंत कारण माझी नोकरी इकडे असल्यामुळें सोलापूर सोडून तंव्र येथें यावें लागलें. शके १८४५ चा भाद्रपद महिना म्हणजे प्लेगचा कोण कहर ! सबंध तालुक्यांत प्लेगचा सारखा सपाटा चालूच होता व खास हदगांवही प्लेगनें दूषित झाल्यामुळें रीतीप्रमाणें सर्वांबरोबर बाहेर झोपड्यावर राहाण्यास गेलों. गांवही लवकरच रिकामें झालें तरीपण झोपड्यावर माणसें मरण्याचा तडाका चालू होता. गांव ल्हान

आणखी देहाची वार्ता कैलासवासास वेळ लागत नसे. क्षणभंगुरतेमुळें प्रत्येकास "जो जाईल तो दिवस बरा" असे वाटत असल्यास नवल नाही. झोपडयावर गेल्यानंतर ७।८ दिवसांनी मला साधारणतःच ज्वर आला पण तो इतक्या भयंकर स्वरूपाचा होत गेला कीं बहुतेक सर्वांची खात्री झाली कीं तो प्लेगच असावा. मात्र माझी मनोदेवता प्लेग असल्याबद्दल खात्री देईना. अखेरीस माझ्या या आजारीपणामुळें झोपडीतील मंडळींत बरीच चर्चा होत असे. या सर्व परिस्थितीनें माझे कुटुंबाची स्थिती घाबरल्यासारखी झाली. कारण दूर देश, जवळ कोणी दुसरें आप्त नाहीं, मी तर अशा आजारी स्थितींत, गांवची परिस्थिति सदरील तऱ्हेची, तेव्हा या एकंदर प्रकारामुळें सारख्या धास्तीनें माझ्या कुटुंबानें ३।४ रात्री जागून काढल्या. जेवणाखाण्याची परवा कशाची? काय होईल नी काय नाही या पुढील भेसूर विचारांनीं डोळ्याचें पाणी चालू असावें श्रीसमर्थांवर तिचाही पूर्ण भरंवसा असल्यामुळें प्रत्येक खेपेस औषध देतेवेळी त्यांत समर्थांची उदी घालून द्यावें व अंगासही वरचेवर उदी लावावी व समर्थांचा सारखा धांवा करावा व लवकर बरें करण्याबद्दल प्रार्थना करावी, असा क्रम चालू असे. मधुन मधुन न घाबरण्याबद्दल मी पुष्कळ धीर देत असें परंतु व्यर्थ; बावरटपणाचें तिचें रडणें कांहींकेल्या आवरत नसे. तिचें तें अरण्यरुदन ऐकण्यास श्रीसमर्थांशिवाय दुसरा कोण असणार? असो. अखेर तीन चार दिवसांनी श्रीसमर्थांचे कृपेनें ज्वर कमी होऊन मी बरा झालों; मी बरा झालों खरा परंतु माझ्या अजारीपणांतल्या अघोर काळजीनें भावी संकटाच्या भेसूर कल्पनेनें उपवास जागरण वगैरेच्या त्रासानें माझ्या कुटुंबाची प्रकृती हळु हळू बिघडत चालली. डोकें दुखणें सुरू झालें व थोडासा ज्वरांशही वाढूं लागला. आंतले आंत दुखणें दाबून टाकण्याचा तिचा प्रयत्न होता. माझ्या मनावर कांहीं परिणाम होईल म्हणून तिनें आपलें दुखणें उघड कळूं दिलें नाहीं. अजारीपणामुळें घरांतील सर्व कामेंकाजेंही करावींत यामुळें तिचें दुखणें हळू हळूं वाढते प्रमाणावर चढत गेलें. तशांत मांजरी ( कांखेतला फोड ) झाली आणि या सर्व अपेक्षेस असह्यताही साह्य करायास आल्यामुळें मग

त्या भागास विचारणें नको. कांखेंतील फोडामुळें सर्वांना वाटलें की आम ही प्लेगची गांठ आहे. परंतु लवकरच उपचारानें ती गांठ फुटून जिरून गेली, तरीही पण अंगांतील ज्वर कांहीं केल्या कमी होईना. अस्पृश्यता निवारणास एक दिवस स्नानही घालावें लागलें, त्यामुळें ज्वर अधिक होईल की काय ही धास्ती होती परंतु त्या दिवशीं ज्वर अजीबात आला नाहीं; पण दुसरे दिवशी त्यानें दुप्पट जोरानें उचल खाल्ली, तो सारखा २० तास पर्यंत टिकून होता. नंतर कमी होऊन थोडें उठून बसून दोन घांसही खाल्ले गेले व कांहींशी झोंपही लागली. दुसरे दिवशीं ज्वर न येण्याबद्दल कांहीं औषध विड्याचे पानांत देण्यांत आलें. रात्रीं औषध दिल्यानंतर अर्ध्या तासानें तिला थोडासा डोळा लागलासें पाहून मीही आपले आंथरुणावर जाऊन काळजी करीत पडलों. मलाही किंचित डोळा लागतो न लागतो तोंच तिनें एकदम जोरानें किंकाळी फोडली व त्या आवाजासरसा मी दचकून जागा होऊन पाहतों तों तिचें घाबरणें व दम दाटून येणें व हाताच्या मुठी वळणें हें चाललें होतें. झोंपेंतच कांहीं भेसूर स्वप्न पडल्यामुळें गांगरली असेल या समजुतीनें मी तिला जागें होण्याबद्दल सांगूं लागलों, तेव्हां तिनें मी पूर्ण जागी आहे परंतु माझ्या गळ्यास एका मोठ्या काळ्या सापानें विळखा घातला आहे व तो माझ्यावर फुस्कारे टाकीत आहे त्याला काढून टाका, मला तो हात लाऊं देत नाहीं असें ती घाबरटपणानें पण न चांचरतां स्पष्ट बोलूं लागली. पुन्हाही माझी कल्पना हिला स्वप्नच पडलें असावें व यामुळेंच ती भ्याली आहे दुसरे कांहीं नाहीं अशीच झाली; तों ती एकदम ताडकन् उठून बसून ‘ तो पहा अजून आपल्या झोपड्याचें मागे तो साप बसून आहे व तेथूनच फुस्कारे टाकीत आहे ’ असें म्हणाली. मी तिचें लक्ष दुसरीकडे लागावें म्हणून तिला सांगितलें कीं, आपल्या देवाचें साईबाबांचें नांव घे म्हणजे तो साप तुला दिसणार नाहीं व भीतीही दाखविणार नाहीं सांगितल्याप्रमाणें तिनें साईबाबांचे नांवाचा जप चालविला. इतका वेळ तिनें भीतीमुळें झांकलेले डोळे उघडले व एकदम माझे गळ्यास मिठी घातली. हा सर्व प्रकार चालू असतां आस-

पासच्या झोपड्यांतील कांहीं मंडळी आंत आली. ' देवाचा कोप आहे, देवाचे नवस फेडीत नाहीत म्हणून मला त्रास होऊं लागला आहे ' असें तिनें उत्तर दिलें. तिची समजूत घालण्याकरितां आपण सर्व नवस फेडूं वगैरे तिला सांगितलें व देवाचा भागही रीती प्रमाणें बांधून ठेवला. हा सर्व प्रकार झाला तरीही तिचें बोलणें कांहीं कमी होईना व स्वस्थ पडून रहाण्यास सांगितलें तरीपण तिच्यानें स्वस्थ पडून रहावेना. अखेर हा काय प्रकार असावा याचें मला कांहीं कोडें उकलेना. अर्धा तास झाला तरी तिचे सापाचे व इतर दैविक विचार कमी होईनात आणि चेहऱ्याची कांती वगैरे पालटून तो काळवंडत चालला व एकदम धास्ती वाटली कीं, हा कांहींतरी शैत्याचा विकार असला पाहिजे व ज्वर थांबण्याकरितां दिलेल्या औषधानें तर एकदम ज्वर थांबून शैत्य झालें नसेल ना ! असें वाटून साधारण रीत्या नाडी पाहिली तों काय सर्वच निराळा प्रकार ! एक दोघांस बोलावून आणून हात दाखविला. त्यांनींही हा शैत्याचा विकार आहे, सन्निपात झाला, त्याला मात्रा द्यावी लागेल, नाहींतर प्रसंग कठीण आहे असें स्पष्ट कळविलें. तितक्यां रात्रीं रानांत कोणा जवळ मात्रा असेल, व कोण देणार ? सर्वांचा पसारा अव्यवस्थितपणें पडलेला असणार व ह्या जिनसा लवकर सांपडणें दुरापास्त इत्यादि विचारांनीं मला क्षणभर भांबावून सोडलें. पण समर्थांचें कृपेनें क्यांपवरच जवळच्या एका सद्गृहस्थांचे घरीं ( सदाशिवराव सलगरकर. र. का. ) त्या मिळाल्या व त्यांनीं स्वतः येऊन सर्व व्यवस्था केली व मात्रा उगाळून पांचपांच मिनिटांनीं चाटवा असें सांगितलें. वाहेरून हा उपचार करीत होतोंच, परंतु अंतस्थ मनाला कांहीं चैन पडेना. " बाबा हा काय प्रसंग आणला ? " असे मनांत हजारो वेळां सहज उद्गार आले व बाबांना बोल लावले. औषध दोन चार वेळ दिल्यानें बोलण्याची टकळी थोडी कमी झाली तरी पण हातांपायांस ऊब व नाडीची गती अद्याप योग्य प्रमाणांत नव्हती त्यामुळें थोडी काळजीच होती. ऊब येण्याकरितांही अनेक उपाय करण्यांत आले. मनांत नाना तऱ्हेच्या कल्पना उद्भवूं लागल्या. दूर ठिकाण, आपलें कोणी आप्त ना इष्ट,

गण ना गोत अशा वेळीं मलाोंच कांहीं घडून आलें तर काय करणार ? माझ्या आजारीपणांत तिच्या मनाचीहि अशीच किंवा यापेक्षां ज्यास्त भयंकर स्थिति झाली असल्यास नवल नाहीं. अशा प्रसंगीं साह्याची याचना तरी कोणाला करणार ? कांहींच सुचेना; मन नुसतें सुन्न झालें. खरोखर आमच्या या हालअपेष्टेकडे श्रीसाईबाबा जरूर पहात होते म्हणूनच निभावलों आणि सर्वस्वी भारही त्यांचेवरच होता. संकटप्रसंगीं स्वामीशिवाय दुसरा कोण धांवून येणार ? तात्पर्य, त्यारात्रीं दोन वाजेपर्यंत सर्वजण काळजींत होते. नंतर हळूहळू नाडीची गती व हातपायांस योग्य प्रमाणांत ऊब आली व मंडळी आपापले घरीं रवाना झाली. तिलाही थोडा वेळ डोळा लागला; जागे झाल्यानंतर मोठ्यानें जरी बोलवत नसे तरीपण हळूहळू 'साईबाबा साई-बाबा' म्हणण्याचा क्रम चालू असे. मधुनमधुन लहर आली कीं, "शिरडी माझें पंढरपूर साईबाबा रमावर " हा अभंग मुक्तकंठानें म्हणत रहावें. इतक्या रात्रीं "बायकांनीं असें गाणें म्हणूं नये लोक काय म्हणतील ? स्वस्थ पडून रहा" असें बरेच वेळा समजावून सांगितलें परंतु व्यर्थ; ती म्हणे, 'मी काय करूं ? मला तें म्हणावेंसेंच वाटतें व साईबाबांना तें आवडतें व ते माझेजवळ ऐकत बसतात त्यामुळें मलाही थोडें बरें वाटते.' पहांटे पहांटे थोडी झोंप लागली त्यामुळें मलाही थोडें हल्कें वाटलें. परंतु पुन्हा काळजी वाढूं लागली. येथें तर वरचे कुणी नाहीं कुणालातरी बोलावून घ्यावें असा विचार ठरवून ताबडतोब पहांटेचें गांवांकडे—मातोश्रीस आणविण्यास पाठविण्यासंबंधानें रात्रीची झालेली हकीकत लिहून पत्रद्वारे भावांस कळविली व कुटुंबाचें समाधाना-करितां तिला वाचून दाखविली. अशा रीतीनें ती रात्र ता. २८।१०।२३ पार पडली ती केवळ समर्थांचे कृपेमुळें. आतां पुढें दुसरें दिवसा पासूनचा तिचा क्रम निराळ्या तऱ्हेचा होऊं लागला. मधुन मधुन मर्जीस येईल तेव्हां अंथरु-णावरून उठावें, हातपाय धुवावे व श्रीसाईबाबांचा फोटो घ्यावा व त्यावर हळदकुंकू अक्षता वगैरे वहावी व आरती लाऊन हात जोडून बाबांची पदें हळू किंवा मोठ्यानें जशी तब्येत लागेल तशीं म्हणंत बसावें व आपले कृपा-

आज व जवळचे कोणी असतील त्यांस मळवट भरावा व उदी लावावी, व कुंकुम रहावें व माझे अंगांत साईबाबांची स्वारी आली आहे त्यामुळें माझी अशी दशा होते, वगैरे म्हणत रहावें. एकदम मोठ्यानें " साईबाबा हो " म्हणून आरोळी यावी अशा तऱ्हेचा प्रकार दिवसांतून ४।५ वेळां व्हावा. मीही समर्थांचे पूजेबद्दल तिचे इच्छेविरुद्ध गेलों नाहीं व आजारी माणसाला अशा तऱ्हेनें अडथळा करणें बरें नाहीं असें समजून मोकळीक दिली. तशांत साईलीलेचा अंक मिळाला. मग काय, त्यांतल्या गोष्टी वाचाव्या व आनंदानें डोलावें व 'माझे बाबा आले या बाबा माझेजवळ बसा म्हणजे मला थोडें बरें वाटतें,' असें म्हणावें. 'अहाहा तुमच्या गळ्यांतल्या फुलांचा वास किती छान आहे ' असें म्हणून फुलांचा वास घेतल्याप्रमाणें श्वास ओढावा व आनंदित व्हावें व माझेकरितां माझ्या बाबाला श्रम होतात म्हणून डोळ्याला पाणीही आणावें, अशा तऱ्हेचा क्रम चालू असे व नेहमीं साईलीलेचा अंक जवळून अगदीं विसंबत नसे व अंथरुणाचे जवळच एका बाजूस स्वच्छ जागा करवून पाटावर श्रीसमर्थांचा फोटो ठेविला होता त्याचेकडे सारखें पहात रहावें. अशा तऱ्हेनें साईमहाराजांचा ध्यास तिचे मनानें एकसारखा घेतला होता. औषधही कधीं उदी टाकल्याशिवाय घेणें नाहीं इतका निर्धार. अंगांतला ज्वर वगैरे कमी झाला पण हें छांदिष्ट वर्तन कांहीं कमी होईना. तिकडील वृत्ती थोडी चळली म्हणजे सोलापूराहून मंडळी आली किंवा नाहीं ? सासूबाईंना आणण्याकरितां घोडे व माणूस पाठविलें किंवा नाहीं ? लवकर आणवा, त्या येथें आल्या म्हणजे मला बरें करतील व सोलापुराकडे घेऊन जातील. या कामांत बाबांना फार त्रास पडत आहे त्यांच्या जिवाची धांदल चालू आहे तुमचे गडी व घोडे त्यांना कशाला ? बाबांनीं त्यांचेकरितां इकडून मुद्दाम गाडी नेली आहे व येथें आपले रक्षणाकरितां त्यांनीं रोहिला ठेवला आहे, व मी सोलापुरास जाऊन मंडळी आणतों म्हणून मला सांगून गेले. मंडळी हैद्राबादेस आणून सोडून पुन्हां माझेकडे येऊन पाहून गेले, व ते गाडींतूनच घेऊन येतों म्हणून सांगून गेले. वस्तुतः

ही दोन घोडीं व माणसें पाठविलीं तीं पोंचण्याचेपूर्वीच ती. मातोश्री वगैरे बैलगाडींत बसून येऊं लागले होते. इकडील एक गाडी अकस्मात् कांहीं काम-निमित्तें तिकडे गेली होती. त्या गाडीवानानें तुमच्या करितांच गाडी आणली आहे असें सांगून त्यांना गाडींत बसविलें व ते निघाले. नंतर थोड्या वेळानें इकडून पाठविलेल्या माणसांची गाठ पडली वगैरे हकीकत मातोश्री येथें आल्यानंतर त्यांचेकडून कळली. तेव्हां कुटुंबाच्या म्हणण्याची सत्यता पटली व खरोखरच श्रीसमर्थांनीं ही अकल्पित योजना कशी केली याबद्दल माझे मनांत आश्चर्य वाटून गहिंवर आला. पत्र पाठविल्या दिवसापासून अमुक दिवशीं मातोश्री येणार त्या बेतानेंच माणसें स्टेशनवर रवाना केलीं गेलीं होतीं त्याप्रमाणें तीं आलींही परंतु येण्याचे अगोदर दोन दिवस, म्हणजे पहिल्या प्रसंगाचे ७ वे दिवशीं पुन्हां अशक्तपणामुळें व ज्वर वगैरे कांहीं नसतांनाच ता. ३१।११।२३ रोजीं एकदम इतक्या भयंकर स्वरूपाचा सन्निपात झाला कीं चेहरा काळवंडला, हातपाय थंड व नाडीची गतीही मंद झाली व अशक्तपणा वाढल्यामुळें शुद्धिही बरीच कमी राहिली होती. इतक्या स्थितींत सुद्धां साईलीलेचें पुस्तक जवळून बाजूस होऊं दिलें नाहीं. पुस्तक कपाळावर ठेवावें हृदयाशीं धरावें हें सर्व न बोलतांच चालू होतें. तिलाही पूर्ण वाटलें असावें कीं, या अरिष्टांतून कांहीं आतां वांचत नाहीं. मी मनानें तर पूर्ण नाउमेद झालों होतों. तरीपण महाराजांवर भर-वसा ठेऊन शक्य तितके, उपाय करून पहावेत, इतक्यावर मर्जी समर्थांची, असें मनास वाटून तितक्या पुरते तें खंबीर झालें होतें. त्या रात्रीही पुन्हां पूर्ववत् स्नेही मंडळी जमा झाली व पूर्ववत् औषध व मात्रा दिल्या तरी कांहीं कमीचें चिन्ह दिसेना. म्हणून माझे स्नेही डॉक्टर शामराव हे त्याच दिवशीं परत आल्याचें कळल्यावरून त्यांना बोलावणें पाठवावें असें वाटलें, पण तित-क्या रात्रीं दीड कोस लांबीवर असलेल्या सरकारी बंगल्यांतून त्यांना बोलावून आणणें म्हणजे खरोखर धाडसाचें होतें. कारण वन्य श्वापदें, दाट झाडी, व अंधारी रात्र इतक्या सर्व अरिष्टांची पर्वा न करितां कोण आपला जीव

घोरयांत घालणार व बोलावून आणण्याचें काम करणार! कोणास सांगावें? परंतु साईसमर्थांचें कृपेनेंच तें सर्व जुळून आलें व रा. गणपतराव वसमतकर यांनी केवळ मित्रप्रेमामुळेंच हें धाडसाचें काम पत्करून ते डॉक्तरास बोलावून घेऊन आले. त्यावेळीं सुमारें दोन वाजण्याचा समय होता. डॉक्तर मजकुरांनीं यथायोग्य तपासणी केली. त्यांचा चेहराही उमेदीची साक्ष पटवूं लागला. तिची शुद्धी उडत चालली; बोलण्यांतील विसंगतपणा वाढूं लागला. अखेरीस डॉक्तरसाहेबांचे मतें इंजेक्शन देण्याचें ठरून तो उपाय झाला व कांहीं वेळ थांबून डॉक्तरची स्वारी रा. शहाणे वकील यांचेकडे झोंपण्यास गेली. काकासाहेब खरोखर त्या रात्रीं खऱ्या कळकळीनें व जिवापाड परिश्रम रा. शहाणे यांनीं व त्यांच्या एकंदर घरच्या मंडळींनीं केले, त्यांचे उतराई होणें मला तर अशक्य आहे. इतरांनींही बरेच परिश्रम घेतले त्याबद्दलही कृतज्ञतापूर्वक त्यांचा मी फार आभारी आहे; या सर्व कृतोपकाराची फेड मजकडून होणें शक्य नाहीं. फक्त एक उपाय मला एवढाच दिसतो कीं समर्थांचे चरणांजवळ त्या मंडळींचें कल्याणाबद्दल नित्य प्रार्थीत रहावें. याशिवाय दुसरें काय असणार? दुसरे दिवशीं उजाडल्या नंतर पुन्हां डॉक्तरसाहेबांची स्वारी आली व प्रकृति तपासली व नाडीची गती व शरिरांतील उष्णता योग्य प्रमाणांत आहे, आतां काळजीचें कारण नाहीं वगैरे माझे समाधानाकरितां मला त्यांनीं सांगितलें; परंतु माझें मन सारखें अंदोलनात्मक स्थितींत होतें. मातोश्रीच्या येण्याची सारखा वाट पहांत होतों पण दूरचा प्रवास असल्यामुळें त्या दिवशींही त्या आल्या नाहींत. दुसरे दिवशीं म्हणजे अश्विन व॥ १२ रोजीं सकाळीं ८ वाजतां येऊन दाखल झाल्या व समागमें सौ० च्या मातोश्रीही आल्या. त्यांनां उभयतांना पाहतांच मला एक प्रकारें थोडें धैर्य आलें, व समाधानही वाटलें. असो त्यांनीं तिची ही भयंकर स्थिति अवलोकन केली. स्त्रियांच्या स्वभावानुरूप त्यांना रडूं कोसळलें; परंतु तसें केल्यानें आजाऱ्याला त्रास होईल वगैरे सांगून मी त्यांना शांत केलें. असो. आधींच माझें अजारीपणाच्या हलाखीनें हवकून गेलेल्या मनाला तिच्या कमकुवत-

पणाची जोड मिळाली व दोन वेळां झालेल्या, सन्निपाताच्या धक्यानें पूर्णपणें तें बेताल झालें व त्याला भ्रम झाल्याचीं स्पष्टपणें चिन्हें दिसूं लागली. शेंकडों जणांचे शेंकडों विचार शेंकडों उपाय व शेंकडो तर्क चालू झाले. नंतर डाक्तरसाहेबांचे सल्ल्याप्रमाणें व मातोश्रींच्या आज्ञेप्रमाणें सोलापुरास नेण्याचें ठरलें. मातोश्री येथें आल्यानंतर दुसरे दिवशीं त्यांनाहि एकाएकीं वाटेच्या श्रमामुळें व उपासतापासामुळें रात्रौ उलट्या होऊं लागल्या. रात्रींतून कमीत कमी १५।२० वेळा मोठ्या तडाकून उलट्या झाल्या.झालें, माझी पुन्हां पांचावर धारण बसली. मला थोडेंसे दैवाबद्दल कौतुक वाटूं लागलें कीं सर्व वेळ एक-वटून नशिबाचे परिक्षेची हीच वेळ ठरली आहे काय ! त्यांना रात्रीं उदी वगैरे दिली व पहांटेच्या वेळेस थोडया उलट्या कमी झाल्या. अशा रीतीनें सुर-वातीपासून १५।२० दिवस इतक्या त्रासांतून पार पडल्यानंतर प्रकृतीतला ज्वरांश थोडा कमी झाल्याचें कळतांच यथून ता. १४ नवंबर रोजी सोला-पुराकडे जाण्याचे उद्देशानें निघालों. वाटेंत बैलगाडींतील प्रवासांत व रेल्वेचे प्रवासांत जो त्रास झाला त्याची आठवण तर अद्याप मनाला थरारून सोडते. वाटेंत श्रीसमर्थ दाजीमहाराज टाकळीकर यांचे दर्शनाकरितां कुटुंबास न्यावें व तेथें सर्व खुलासा होईल, या मातुश्रींच्या आज्ञेप्रमाणें त्या महाराजांचे दर्शनास गेलों व तेथें गेल्यानंतर महाराजांचें घरींच उतरलों. महाराजांनीं सर्व स्थिति पाहिली व भोजन करतेवेळीं त्यांनीं या बाबतींत जें सांगितलें तें खालीं लिहीत आहे त्यावरून श्रीसमर्थांनीं संकटांतून कसें रक्षण केलें, व त्यांच्या नामस्मरणामुळें ही मृत्यूसारखी घोर अरिष्टेंही कशीं टळूं शकतात याबद्दल त्यांनीं खुलासा केला तो असा:–हा, वाताचा विकार आहे. वायु मस्तकांत चढला असून तो ९० दिवसांपर्यंत राहील. पुढें कमी होऊन पूर्व-वत् स्थिति होईल. सौम्य उपाय चालू ठेव. दोन वेळां जिवावरचें खडतर गंडांतर नाहींसें झालें. तसें न होतें तर गरीब ब्राह्मणाचें घर बुडत होतें. फक्त नामस्मरणाच्या सतत ध्यासानें हें अरिष्ट नाहींसें झालें, कांहीं काळजी नको; त्याचा तोच तारता आहे. मारणाऱ्यापेक्षां तारणारा जबरदस्त असावा व

चेंच ध्यान करावें वगैरे वगैरे. 'ही पिशाच्च बाधा तर नाहीं ना?' असें मातु-
नें विचारलें असतां, " त्यांस भूतबाधा वगैरे कांहीं नाहीं काळजी नको
त्रास धोका नाही " वगैरे उत्तर मिळालें. तेथून पुन्हां सायंकाळीं पूर्णा
सनवरून निघून मनमाडास उतरून तेथून कोपरगांव स्टेशनावर उतरलों
श्रीसमर्थांचे दर्शनाकरितां श्रीक्षेत्र शिरडीस गेलों. ( ता. १७ नवंबर २३,
स.) जाण्यायेण्याचा एकदम तांगा ठरवून महाराजांचे समाधीचें दर्शन घेतलें.
थें नेतांच तिच्या चित्तांत एकदम थोडासा फरक पडला व आश्चर्यचकित
ईनें बराच वेळ समाधिकडे सारखी पहात राहिली व चांगली शुद्धीवर येऊन
ी समाधीला शिवूं कां? मला पायां पडायचें आहे वगैरे विचारूं लागली. पर-
ानगी मिळतांच चटकन् उठून समाधीवर बराच वेळ डोकें व हात ठेवून
तब्ध राहिली व नंतर तेथील उदी स्वतःच घेऊन आपल्या कपाळास लावून
महाराजांचा जयजयकार म्हणून टाळ्या वाजविण्याचा सपाटा चालविला. नंतर
तिला तेथून बाबांच्या मशिदीकडे घेऊन गेलों. तेथें बाबांच्या नवीन बसव-
लेल्या तसबीरीकडे पाहून 'हे तर बाबा बसले आहेत, हेच मला सांभाळण्या-
करितां आले होते ' वगैरे म्हणत त्यांच्या पादुका उचलून मस्तकावर धरून
पुन्हा खालीं ठेवल्या व पायां पडून फुलें वगैरे वाहून तेथून नानासाहेबांच्या
वाड्यांतील फोटोकडे येऊन बसली असतां त्या फोटोकडे पाहून तिनें मोठ्या
जोरानें दगडाच्या जोत्यावर डोकें आपटलें व 'बाबा हे काय केलेंत' इतके
म्हणून पुन्हा दुसऱ्यानें डोकें आपटण्याचा तिचा विचार होता परंतु तित-
क्यांत सांवरून धरल्यामुळें तसें करितां आलें नाहीं. असो. नंतर तेथील खाणा-
वळींत भोजन वगैरे आटोपून परत जाण्यास निघालों. श्रीक्षेत्र शिर्डीस
ज्याचवेळां आलों गेलों परंतु प्रत्येक खेपेस तेथें आपली व रा. माधव-
रांची नेहमी गांठ पडायचीच परंतु त्या खेपेस उभयतांपैकी कोणीच न
भेटल्यामुळें मनास हळहळ वाटली. पण उपाय काय? सायंकाळीं परत
निघालों. वाटेंतील गारठ्यानें व थंडीनें पुन्हा बरीच बेजार झाली. असो. या
सर्व त्रासांतून व वाटेंतील रेल्वेंतील त्रासांतून ( कारण त्यावेळी कार्तिकीची

पंढरपूरची यात्रा असल्यामुळें फराच त्रास झाला ) कसातसा रविवारी रात्री दोन वाजण्याचे सुमारास घरीं पोंचलों. तेथें पोंचल्यानंतर डाक्तरी व वैद्यकी चिकित्सा करण्याकरितां दोन्ही धंद्यांतले निष्णात लोकांस तिला दाखविण्यांत आलें व त्यांचे म्हणण्याप्रमाणें उपाय चालू ठेवला. पुढें श्रीसमर्थ दाजीमहाराज टाकळीकर यांनीं कथन केल्याप्रमाणें ठराविक मुदतींत ती पूर्ण बरी झाली. एक वर्ष पूर्ण झालें, प्रकृतींत हल्ली कोणताच दुषितपणा राहिला नाहीं. आणि हें सर्व समर्थांच्या पूर्ण कृपचेंच दर्शक होय. देवाच्या नामस्मरणाच्या योगानें मृत्युसारखी अरिष्टें टळतात असें ऐकण्यांत होतें परंतु त्याचा प्रत्यक्ष अनुभव श्रीसमर्थांनीं मला दिला. त्याबद्दल आतां कोणतीच शंका राहिली नाहीं. यदाकदाचित् शंका राहिलीही असती परंतु श्री. दाजीमहाराजांचे खुलाशानें शंकेला वावच राहिला नाहीं. असो. एवंच भक्त कैवारी व दीनाचा दयाळू अशा श्री साईबाबांनीं आमचेवर आलेलें अरिष्ट टाळून आज चांगला दिवस दाखविला तो, केवळ त्यांच्या कृपेचेंच फळ होय. तसें नसतें तर आमच्या त्या स्थितींतील अरण्य रुदन ऐकणारा व संकटीं उडी घालून वांचविणारा दुसरा कोण होता ? आम्हामुळें त्यांना अतिशय त्रास घ्यावा लागला व "माझें पायरीचें दर्शन घेणारास मी कधीही विसंबत नाहीं" या ब्रीदाची सत्यता पटविली. काकासाहेब, त्या परिस्थितीचें हें अपुरें शब्दचित्र रेखाटलें गेलें; खरें चित्र व त्या यातनांची जाणीव व आर्तस्वरानें तिनें केलेल्या धांव्याच्या आरोळ्यांनीं व मजकडून घडलेल्या व असमंजसपणाच्या तिच्या स्थितींत तिला दिल्या गेलेल्या त्रासाच्या जाणीवेनें माझें मन अद्याप थरारून जातें, व कांहीं क्षण तरी मला अगदीं विषण्ण करून सोडतें. आणि ही मनांतली तळमळ, हा मनाचा मुका मार आंतल्या आंतच सोसावा लागत आहे त्याला उपाय नाहीं. या करितां श्रीसमर्थांचे चरणीं एवढीच विनंती आहे कीं, "ही तळमळ शांत कर. हे देवाधिदेवा—हे साईबाबा, संकटकालीं भक्तांचीं संकटें निवारण्यास व धांवण्यास धांवत बसण्याचे श्रम करण्यापेक्षां संकटेंच अजिबात निर्माण केलीं नसती तर चाललें नसतें काय ? असें

करण्यांत तुझे कितीतरी श्रम वांचले असते. कारण या श्रमाचा मोबदला आम्ही क्षुद्र मानव प्राणी काय देणार व उतराई तरी कशी होणार? या तुझ्या एकाच केलेल्या श्रमाचा मोबदला लक्षांशानें सुद्धां कोट्यावधी जन्म घेऊनही फिटणार नाही. म्हणून अनंत जन्मींच्या या अगणित कृपाभारामुळें तुझ्या पदकमलीं मी अनन्य भावानें शरणागत आहे."

"त्या तुझें अभय असो."

तथास्तु (इतकें मागण्यापलीकडे आपल्या हातीं काय आहे.)

**शांतिः शांतिः शांतिः**

दास:

**वासुदेव.**

# अध्याय २५ वा.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
श्रीकुलदेवतायैनमः । श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥
श्रीसद्गुरु साईनाथायनमः

साई महाराज कृपासागर । साक्षात् ईश्वरी अवतार ॥
पूर्णब्रह्म महान योगेश्वर । साष्टांग नमस्कार तयांसी ॥ १ ॥
जय जयाजी संतललामा । मंगलधामा आत्मारामा ॥
साईसमर्था भक्तविश्रामा । पूर्णकामा तुज नमो ॥ २ ॥
पूर्वाध्यायीं निरूपण । थट्टा विनोद परिशीलन ॥
परी हा साई भक्त भावन । भक्तरंजन नित्य करी ॥ ३ ॥
साई परम दयामूर्ती । एक पाहिजे अनन्य भक्ति ॥
भक्त श्रद्धाळू आणि भावार्थी । इच्छितार्थी ना न्यून ॥ ४ ॥
' सद्गुरु तोचि माझी मूर्ती ' । कृष्ण बोले उद्धवाप्रती ।
ऐसा सद्गुरु भजावा प्रीती । अनन्य भक्ती या नांव ॥ ५ ॥
अंतरीं उदेला मनोरथ । त्याहावें श्रीसाईचरित ॥
लीला श्रवणार्ह अत्यद्भुत । लिहवूनि निश्चित मज केलें ॥ ६ ॥
नसतां अधिकार ज्ञान व्युत्पत्ति । मज पामरा स्फुरविली स्फूर्ति ॥
ग्रंथ लिहिविला माझिये हातीं । द्यावया जागृति निजभक्तां ॥ ७ ॥
दप्तर ठेवी ऐसी अनुज्ञा । जेव्हां जाहली मजसम अज्ञा ॥
तेव्हांच माझी अल्प प्रज्ञा । धैर्य विज्ञान संपन्न ॥ ८ ॥

तेव्हांच मज आला धीर। कीं हा साई गुण गंभीर ॥
देऊनि घेणार अपुलें दफ्तर। निज भक्तोद्धार कारणें ॥ ९ ॥
नातरी हा वाग्विलास। होतें काय मज हें साहस ॥
संतचरण प्रसाद पायस। चरित सुधारस हा ऐसा ॥ १० ॥
ही श्रीसाईचरित रूपा। भक्तार्थ साईकथामृतप्रेपा ॥
यथेच्छ सेवा साईकृपें। भवदवतापा निवारा ॥ ११ ॥
चरित नव्हे हा सोमकांत। साईकथा चंद्रामृत स्रवत ॥
भक्त चकोर तृषाकुलित। होवोत तृप्त मनसोक्त ॥ १२ ॥
आतां प्रेमळ श्रोतेजन। संकोचरहित एकाग्र मन ॥
परिसोत या कलिमलदहन। कथा पावन साईच्या ॥ १३ ॥
घडली एकदा अनन्य निष्ठा। कीं त्या भक्ताच्या सकळ अनिष्ठा ॥
दारूनि अर्पितो तया अभीष्टां। तयाचे कष्टा निवारी ॥ १४ ॥
ये अर्थींची एक वार्ता। दावील साईची भक्तवत्सलता ॥
श्रोतीं परिसतां ती सादरता। आनंद चित्ता होईल ॥ १५ ॥
तरी लावूनिया जीव। कथा ऐका हे अभिनव ॥
घटेल मनास अनुभव। कैसी दयार्णव गुरुमाय ॥ १६ ॥
कथा जरी ही बहु तोकडी। अर्थावबोधें अति चोखडी ॥
अवधान दीजे एक घडी। सरतील सांकडीं वाजूला ॥ १७ ॥
अहमदनगरचे सुखवस्त। कासार एक धनवंत ॥
दामूअण्णा नामें भक्त। पदीं जे अनुरक्त साईच्या ॥ १८ ॥
तया परम भक्ताची कथा। आनंद होईल श्रवण करितां ॥
भक्तरक्षणतत्परता। दिसेल प्रत्यक्षता साईची ॥ १९ ॥
रामनवमी वार्षिकोत्सवीं। मोठीं दोन निशाणें नवीं ॥
नियती मिरवीत शिर्डी गांवीं। आहेत ठावीं तत्रस्थां ॥ २० ॥

---

१ पाणपोई. २ साईकृपनें. ३ संसाररूपी वणव्याचे तापास. ४ इच्छिलेले मनोरथास. ५ दयेचा सागर. ६ सुखवस्तु गृहस्थ.

त्यांतील एक निमोणकरांचें । दुसरें या दामूअण्णांचें ॥
नेम हे त्यांचे कैक वर्षांचे । भक्तिप्रेमाचे अव्याहत ॥ २१ ॥
तीन स्त्रिया दामूअण्णास । पुत्र संतती नव्हती त्यांस ॥
लाधून साईंच्या आशिर्वादास । पुत्ररत्नास पावलं ॥ २२ ॥
केला निशाणाचा नवस । रामनवमीच्या उत्सवास ॥
आरंभ झाला मिरवणुकीस । निशाण वर्षास तेथून ॥ २३ ॥
कोंडचा सुताराच्या घरीं । होते मिरवणूकीची तयारी ॥
तेथूनि मग वाद्यांचे गजरीं । निशाण मिरवीत नेतात ॥ २४ ॥
मशिदीचिया दोनी टोंका । बांधिती या दीर्घ पताका ॥
समारंभेसि महोत्सव निका । करिती विलोका प्रतिवर्षीं ॥ २५ ॥
तैसेंच तेथें जे फकीर येती । तयांस यथेष्ट जेवूं घालिती ॥
रामनवमी ऐसिये रीती । प्रतिपाळिती हे शेट ॥ २६ ॥
त्या या दामूअण्णाची कथा । श्रवणार्थियां निवेदितों आतां ॥
श्रवण करितां सावधानता । साईसमर्थता प्रकटेल ॥ २७ ॥
मुंबानगरीचा तयांचा स्नेही । मुंबईहून पत्र लिही ॥
दोंलाख निव्वळ नफा होई । ऐसी किफाईत करूंकी ॥ २८ ॥
तुम्हाअम्हां भागी देख । कमावूं प्रत्येकी लाख लाख ॥
उत्तर धाडा करा चलाख । धंदाही चोख निर्भय कीं ॥ २९ ॥
खरेदूं कापूस ये वेक्तीं । भाव चढेल हातोहातीं ॥
सौदा न साधिती वेळेवरती । मग ते पस्तावती मागाहून ॥ ३० ॥
दवडूं न द्यावी ऐसी वेळ । उडाली अण्णांचे मनाची खळबळ ॥
भरंवसा त्या स्नेह्यावरी सबळ । विचार निश्चळ सुचेना ॥ ३१ ॥

---

१ कै. वा. शंकरराव रघुनाथ देशपांडे उर्फ नानासाहेब निमोणकर.
२ एवढा नफा जेणें करून होईल असा धंदा. ३ त्वरा; जल्दी. ४ पावेतों.
५ पश्चात्ताप पावतात. ६ निश्चित.

धंदा करावा वा न करावा । विचार पडला अण्णाचे जीवा ॥
काय होईल कैसें देवा । गोवा पडला मनाला ॥ ३२ ॥

दामूअण्णाही गुरुपुत्र । बाबांस लिहिते झाले पत्र ॥
आम्हा न बुद्धि स्वतंत्र आपणचि छत्र आम्हातें ॥ ३३ ॥

व्यापार हा तो सकृद्दर्शनी । करावा ऐसें येतें मनीं ॥
परी होईल लाभ कीं हानी । कृपा करोनि सांगाजी ॥ ३४ ॥

पत्र लिहिलें माधवरावा । कीं हे बाबांस वाचून दावा ॥
आज्ञा होईल तसें कळवा । उद्यम बरवा वाटतो ॥ ३५ ॥

दुसरे दिवसीं तिसरे प्रहरीं । पत्र पडलें माधवरावकरीं ॥
तेणें नेऊनि मशीदीभीतरीं । चरणावरी घातलें ॥ ३६ ॥

'काय शामा काय घाई । कागुद कसला लावितो पायीं ?' ॥
बाबा तो नगरचा दामुशेट कांहीं । विचारूं पाहीं आपणातें ॥ ३७ ॥

'कां बरें तो काय लिहितो । काय कसले बेत करितो ॥
वाटे आभाळा हात लावितो । देव देतो तें नको ॥ ३८ ॥

'वाच वाच पत्र याचें' । शामा म्हणे जें वदतां वाचे ॥
तेच अर्थाचें पत्र साचें । दामूअण्णाचें अक्षरशः ॥ ३९ ॥

देवा आपण बसतां निश्चळ । उडवितां भक्तांची खळबळ ॥
मग होतां मनाची तळमळ । पायांजवळ आणितां ॥ ४० ॥

कोणास स्वयें ओढून आणितां । कोणालागीं पत्रें लिहवितां ॥
अंतस्थ आशय आधींच सांगतां । मग वाचवितां किमर्थ ॥ ४१ ॥

'अरे शामा वाच वाच । माझें काय मानितो साच ॥
मी तव अपुला आहे असाच । बोलें उगाच मानेतें' ॥ ४२ ॥

---

१ गुंती संशय. २ वाचेस येईल तें.

मग माधवराव पत्र, वाचिती । बाबा लक्ष लावूनि ऐकती ॥
कळकळूनि मग बाबा वदती । 'चळली मती शेटीची' ॥ ४३ ॥

सांगकीं तयास प्रत्युत्तरीं । 'कायउणें तुज असतां घरीं ॥
पुरे अपुली अर्धी भाकरी । लाखाचे भरी पडूं नको' ॥ ४४ ॥

प्रत्युत्तराची क्षणक्षणा । वाटचि पाहत दामू अण्णा ॥
उत्तर येतांचि तत्क्षणा । दामूअण्णा वाचिती ॥ ४५ ॥

ऐकूनि त्या प्रत्युत्तराला । दामूशेटीचा विरस झाला ॥
मनोरथाचा दुर्गचि ढासळला । वृक्ष उन्मळला आशेचा ॥ ४६ ॥

आतां एकलाख कमावूं । अर्धालाख व्याजीं लावूं ॥
तात्काळ लाखे सावकार होऊं । आनंदें राहूं नगरांत ॥ ४७ ॥

मनोराज्य होतें जें केलें । जागचे जागींच तें विरघळलें ॥
दामूअण्णा अत्यंत हिरमुसले । हें काय केलें बाबांनीं ॥ ४८ ॥

पत्र लिहिलें एथेंच फसलें । अपुलें आपण अनहित केलें ॥
देखत देखत वाढिलेलें । ताट लाथाडिलें आपणचि ॥ ४९ ॥

असो त्या पत्रांत दामूअण्णातें । ऐसेंही ध्वनित केलें होतें ॥
कानाडोळ्यांचें अंतर असतें । यावें कीं येथें समक्ष ॥ ५० ॥

ऐसें माधवरावांचें सूचित । समक्ष जावें वाटलें उचित ॥
न जाणों असेल त्यांतही हित । कदाचित अनुमत देतील ॥ ५१ ॥

ऐसा विचार करूनि मनीं । अण्णा आले शिर्डी लागुनी ॥
बैसले बाबांचे सन्निधानीं । लोटांगणीं येऊन ॥ ५२ ॥

हळू हळू पाय दाविती । विचारावया नाहीं धृती ॥
अंतर्यामी उठली वृत्ती । बाबांची पाती ठेवावी ॥ ५३ ॥

---

१ भाग.

मनीं म्हणती साईनाथा । कराल जरी या व्यापारा साह्यता ॥
नफ्याचा कांहीं भाग मी अर्पीन । पायांवरता होईन ॥ ५४ ॥
मनकीं धरिले साईचरण । दामू अण्णा बैसले क्षण ॥
संकल्प विकल्प मनाचें लक्षण । व्यापार आंतून चालले ॥ ५५ ॥
भक्ती करावे मनोरथ । ते न जाणती खरा स्वार्थ ॥
गुरु एक जाणे शिष्याचें हित । भावी भूतवर्तमान ॥ ५६ ॥
निजमनीचें मनोगत । कोणी कितीही ठेवो गुप्त ॥
साई समर्थ सर्वगत । अंतर्वृ[१]त्त जाणे तो ॥ ५७ ॥
जेव्हां कोणी मनीचें हृद्गत । साई चरणीं प्रेमें निवेदित ॥
पूर्ण विश्वासें अनुज्ञा प्रार्थित । दावित सत्पंथ साई त्यां ॥ ५८ ॥
हें तो तयाचें निजव्रत । जाणती हें भक्त समस्त ॥
जो जो अनन्य शरणागत । आपदा वारीत तयांच्या ॥ ५९ ॥
गुरुचि सत्य मातापिता । अनेका जन्मींचा पातात्राता ॥
तोचि हरिहर आणि विधाता । कर्ताकरविता तो एक ॥ ६० ॥
बाळ मागतां गोडघट्ट । माता पाजी बोळकडू ॥
बाळ तडफडू वा रडू । प्रेम निवाडू हा ऐसा ॥ ६१ ॥
बोळाचा तो कडूपणा । योग्य काळें चढणार गुणा ॥
बाळ काय जाणे त्या लक्षणा । मातेच्या खुणा मातेस ॥ ६२ ॥
अण्णा जरी टेंविती पाती । बावा काय तेणें भुलती ॥
लाभेंवीण तयांची प्रीती । निजभक्तहितीं तत्पर ॥ ६३ ॥
धनकनक जयां माती । किंपदार्थ तयांतें पाती ॥
केवळ दीन जनोद्धरणार्थीं । जगीं अवतरती हे संत ॥ ६४ ॥

---

१ सर्वांतर्यामी २ एक जातीचें औषध.

यमनियमशमदमसंपन्न । मायामात्सर्यदोषविहीन ॥
केवळ परानुग्रह प्रयोजन । ज्यांचें जीवन तो संत ॥ ६५ ॥
दामूअण्णाची ही पाती । मनींचेमनीं गुप्त होती ॥
बाबा प्रकट उत्तर देती । सादरवृत्ती परिसावें ॥ ६६ ॥
जीवमात्राचें मनोगत । बाबांस सकळ अवगत ॥
वर्तमान भविष्य भूत । जैसा करतलगत आमलक[1] ॥ ६७ ॥
निज भक्ताची भावी स्थिती । समस्त ठावी बाबांप्रती ॥
कैसे वेळेवर सावध करिती । ती स्पष्टोक्ती परिसावी ॥ ६८ ॥
" आपण नाहीरे बापू[2] किसमें " । बाबा देती सूचना प्रेमें ॥
व्यापार बरवा साईस न गमे । अण्णा शरमे मनांत ॥ ६९ ॥
ऐकून हें बाबांचें वचन । दामूअण्णास पटली खूण ॥
दिधला मनाचा संकल्प सोडून । बैसले अधोवदन उगा ॥ ७० ॥
पुनश्च मनीं उठला विचार । करूं काय दुसरा व्यापार ॥
तांदूळ गहूं भुसार । परिसा प्रत्युत्तर बाबांचें ॥ ७१ ॥
पांच शेर तूं घेसील । सातशेर ओपिसील[4] ॥
परिसून हे बाबांचे बोल । अंतरीं खजील अण्णा तें ॥ ७२ ॥
ऐसें कोठें कांहींही न घडे । जें साईच्या दृष्टीस न पडे ॥
खालीं वरतो जिकडे तिकडे । सर्वत्र उघडें तयास ॥ ७३ ॥
येरीकडे त्यांचा स्नेही । विचार गहनीं पडला पाहीं ॥
काय करावें सुचेना कांहीं । उत्तरही नाहीं अण्णांचें ॥ ७४ ॥
तों ते शेट पत्र लिहित । वृत्तांत घडलेला कळवित ॥
वाचूनि स्नेही विस्मित होत । म्हणती कर्मगत विचित्र ॥ ७५ ॥
काय सौदा चालून आला । स्वयेंच कां ना विचार केला ॥
किमर्थ फकीराचे नादीं लागला । व्यर्थ मुकला लाभाला ॥ ७६ ॥

१ आवळा. २ बाबा. ३ करांतही. ४ देशील. ५ साईबाबांचे.

देव देतो कर्म नेतें । होणारा सारखी बुद्धि होते ॥
ऐसा चोख धंदा जेथें । फकीर तेथें कां व्हावा ॥ ७७ ॥

व्यवहारावर देऊनि पाणी । दारोदार वेड्यावाणी ॥
पोट भरिती तुकडे मागुनि । ते काय सांगूनि सांगती ॥ ७८ ॥

असो नाहीं तयाचे दैवीं । तेणेंच ऐसी त्या बुद्धि व्हावी ॥
दुसरी कोणी पोती पहावी । 'यदभावी न भावी' तें ॥ ७९ ॥

झालें अण्णा स्वस्थ बसले । होतें जयाचें कर्म ओढवलें ॥
तेच त्या स्नेह्याचे पातीदार झाले । आलें तपेलें गळ्यांत ॥ ८० ॥

करावया गेले सट्टा । परी तयांचा दिवस उलटा ॥
ठोकर लागली झाला तोटा । कैसा सोटा फकीराचा ॥ ८१ ॥

काय माझा दामूअण्णा । नशीबाचा, मोठा शहाणा ॥
खरा त्याचा साई दाणा । भक्त करुणा केवढी ॥ ८२ ॥

स्नेही म्हणून माझे फंदीं । पडतां नागवता स्वच्छंदीं ॥
हरला विचारा फकीराचे नादीं । काय दृढबुद्धि तयाची ॥ ८३ ॥

थट्टा त्याचे वेडेपणाची । घमंड माझे शहाणपणाची ॥
व्यर्थव्यर्थ जहाली साची । अनुभव हाची लाधलों ॥ ८४ ॥

उगीच त्या फकिराची निंदा । न करितां लागतों त्याचे नादा ॥
मजलाही तो वेळेवर जागा । करिता न दगा होता हा ॥ ८५ ॥

आतां आणीक एक वार्ता । सांगून आवरूं अण्णाच्या ग्रंथा ॥
आनंद होईल श्रोतियां चित्ता । वाटेल आश्चर्यता बाबांची ॥ ८६ ॥

पहा एकदां ऐसें वर्तलें । गोव्यांहून पार्सल आलें ॥
आंबे नामांकित कोणी धाडिले । मामलेदार राळे या नावें ॥ ८७ ॥

---

१ भागीदार. २ जें घडावयाचेंच नाहीं तें घडणारच नाहीं. ३ फसला असता.

माधवरावांच्या नांवावर । बाबांच्या पायीं व्हावें सादर ॥
म्हणून कोपरगांवीं स्वीकार । होऊनि शिरडीवर तें आलें ॥ ८८ ॥

मशिदींत बाबा समोर । उघडतां आंबे निघाले सुंदर ॥
होते एकंदर तीनशेंवर । फळें तीं मधुर पायरीपैकीं ॥ ८९ ॥

बाबांनीं तीं अवघीं पाहिलीं । माधवरावापाशीं दिधलीं ॥
त्यांनीं चार कोळंब्यांत टाकिलीं । उरलीं तीं नेलीं बरोबर ॥ ९० ॥

फळें पडतां कोळंब्यांत । बाबा मुखें काय उद्गारत ॥
'फळें तीं दामूअण्णा प्रीत्यर्थ । असूं दे तेथ पडलेलीं' ॥ ९१ ॥

यावर जातां दोन तास । आले पूजा करावयास ॥
दामू अण्णा मशिदीस । पुष्प संभारास घेऊनी ॥ ९२ ॥

तयां न पूर्व वृत्त तें कळलें । बाबा मोठ्यानें बोलूं लागले ॥
'आंबे दाम्याचे न ते आपुले । खावया टपले लोक जरी ॥ ९३ ॥
ज्याचे आंबे त्यानेंच घ्यावे । किमर्थ आपणा कोणाचे व्हावे ॥
ज्याचे असतील त्यानेंच खावे । मरुनि जावें खावोनी' ॥ ९४ ॥

प्रसादाचि हा ऐसिया भावें । अण्णा स्वीकारिती स्वभावें ॥
विपरीतार्थालागी न भ्यावें । पूर्ण हें ठावें अण्णास ॥ ९५ ॥

पूजा सारोनि अण्णा गेले । पुनश्च येऊनि पुसूं लागले ॥
मोठीस कीं धाकटीस हीं फळें । अर्पूं न कळे कोणास ॥ ९६ ॥

बाबा वदती धाकटीला । दे आठ मुलें होतील तिजला ॥
चार मुलगे चार मुलींला । ही आम्रलीला प्रसवेल ॥ ९७ ॥

पोटीं नाहीं पुत्र संतान । म्हणून करावे बहु प्रयत्न ॥
साधुसंतांचें करावें भजन । कृपाशिर्वचन मिळवावें ॥ ९८ ॥

---

१ एक मातीचा ठाव. २ मोठ्या बायकोला कीं धाकट्या बायकोला.

यदर्थ साधुसंतांचा नाद । गिळावया ग्रह प्रसाद ॥
ज्योतिर्विद्येचा लागला छंद । जाहले ज्योतिर्विद स्वयमेव ॥ ९९ ॥

नशीबीं नाहीं संतान । हेंच ज्योतिर्विद्येचें निदान ॥
अण्णा होते पूर्ण जाणून । निराश होऊन बसलेले ॥ १०० ॥

तथापि हें आश्वासन । साई संत मुखींचें वचन ॥
पुनश्च आशा झाली उत्पन्न । समर्थ प्रसन्न होतांची ॥ १०१ ॥

असो पुढें कालांतरें । सफल झालीं बाबांचीं अक्षरें ॥
संतप्रसादाम्रांकुरें । संतति फलभरें प्रसवलीं ॥ १०२ ॥

जैसे बोलले तैसेंच घडलें । अपुलें ज्योतिष निर्फळ झालें ॥
साईचे बोल अमोघ ठरले । जाहलीं मुलें वचनोक्त ॥ १०३ ॥

असो ही तों बाबांची वैखरी । बाबा असतां देहधारी ॥
परी पुढेंही देह त्यागानंतरी । स्वयें निर्धारी निज महिमा ॥ १०४ ॥

झालों जरी गत प्राण । वाक्य माझें माना प्रमाण ॥
माझीं हाडें तुर्बती मधून । देतील आश्वासन तुम्हांस ॥ १०५ ॥

मी काय पण माझी तुर्बत । राहील तुम्हांसवें बोलत ॥
जो तीस अनन्य शरणागत । राहील डोलत तयासवें ॥ १०६ ॥

डोळ्याआड होईन ही चिंता । करूं नका तुम्हीं मज करितां ॥
माझीं हाडें ऐकाल बोलतां । हितगुज करितां तुम्हांसवें ॥ १०७ ॥

मात्र माझें करा स्मरण । विश्वासयुक्त अंतःकरण ॥
ठेवा करा निष्कामभजन । कृतकल्याण पावाल ॥ १०८ ॥

हे भक्तकाम कल्पतरो । समर्थ साई श्रीसद्गुरो ॥
हेमाड तझिया चरणां न अंतरो । भाकी परोपरी हे करुणा ॥ १०९ ॥

१. कबर.

धावपावगा गुरुवरा । भक्तजन करुणाकरा ॥
उसंत नाहीं या संसारा । येरझारा पुरे आतां ॥ ११० ॥

आम्हां स्वभावप्रवृत्तिपरां । बाह्य विषयालोचनें नसरां ॥
विषय भोगांपासाव आवरा । वृत्तीसीं करा अंतर्मुख ॥ १११ ॥

लाटेस रसे सैरा वाहत । चाललों आम्ही भवसागरांत ॥
देऊनिया प्रसंगीं हात । भव निर्मुक्त करा कीं ॥ ११२ ॥

इंद्रियें वाहती सैरावैरा । । प्रवृत्त होती दुराचारा ॥
बांधा उच्छृंखल नदीस बंधारा । फिरवा माघारा इंद्रियगण ॥११३॥

इंद्रियें न जों अंतर्मुख । आत्मा न कदा होईल सन्मुख ॥
त्याविण कैंचें आत्यंतिक सुख । जन्म निरर्थक होईल ॥ ११४ ॥

कलत्र पुत्र मित्रपंक्ति । कोणीही कामा येती न अंतीं ॥
तूंचि एक अखेरचा साथी । सुख निर्मुक्तीदायक तूं ॥ ११५ ॥

उकलून कर्माकर्माचें जाळें । करी एकवेळ दुःखावेगळें ॥
उद्धरीं हे दीनदुबळे । कृपाबळें महाराजा ॥ ११६ ॥

वादावादी इतर अवकळा । कृपाबळें समूळ निर्दळा ॥
रसनेस लागो नामाचा चाळा । सुनिर्मळा साईराया ॥ ११७ ॥

ऐसें देई प्रेम मना । घालवी संकल्पविकल्पांना ॥
विसरवी देहगेह भाना । माझा मीपणाही दवडी ॥ ११८ ॥

घडो तुझें नामस्मरण । व्हावी न इतर आठवण ॥
यावें मनासि निश्चलपण । चंचलपण नातळो ॥ ११९ ॥

त्यां आम्हां धरितां पोटाशीं । मावळेल अज्ञानतमनिशी ॥
सुखें नांदूं तुझिया प्रकाशीं । उणें आम्हांसी कायसें ॥ १२० ॥

१ मनास वाटेल तसें वागणारांस. २ बहिर्मुखांस.

तुम्हां हें जें आह्लादन । पाजिलें निजचरितामृत ॥
आपणोनि जें केलें जागृत । हें काय सकृत सामान्य ॥ १२१ ॥

पुढील अध्याय याहूनि गोड । पुरेल श्रवणार्थियांचें कोड ।
वाढेल साईचरणीं आवड । श्रद्धा ही सदृढ होईल ॥ १२२ ॥

आले एक भक्त दर्शना । सोडूनिया निज गुरुचरणा ॥
करितां साईपदाभिवंदना । निजगुरुस्थाना दृढ केलें ॥ १२३ ॥

तैसेच एक दुसरे गृहस्थ । श्रीमंत परी विपद्ग्रस्त ॥
आले पुत्रकलत्रसहित । दर्शनार्थ साईच्या ॥ १२४ ॥

कैसा तयांचा पुरविला हेत । कैसा पुत्र अपस्मारव्यथित ॥
केला दर्शनें व्याधिनिर्मुक्त । पूर्वदृष्टांत स्मरवुनी ॥ १२५ ॥

म्हणोनि हेमाड साईंस शरण । करी श्रोतयां आदरें विनवण ॥
होऊनि साईकथाप्रवण । कराजी श्रवणसार्थक्य ॥ १२६ ॥

स्वस्ति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाई समर्थ सच्चरिते । भक्ताभीष्ट संपादनं नाम ॥
पंचविंशतितमोऽध्याय: संपूर्ण:

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु शुभं भवतु ॥